करोना2020/सूचनां/आदेश क्र.१७६५

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- 02141-222118/222097/222001 फॅक्स क्रमांक: 02141-222025/227451

Email : collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./कोरोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. ०४/04/2020

---

**अतितात्काळ**

**स्मरण पत्र क्र.1**

प्रति,

श्री. जयराम देशपांडे

उपजिल्हाधिकारी, मेट्रो सेंटर पनवेल क्र.1

जिल्हा रायगड

विषय :- करोना विषाणू (COVID-129) या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनां करणेबाबत

संदर्भ :- 1) या कार्यालयाकडील आदेश क्र.127 दि.26/03/2020

2) या कार्यालयाकडील पत्र दि.26/03/2020

शासनाने करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि.13/03/2020 लागू करण्यात आलेला आहे. सध्या महाराष्ट्रासह संपूर्ण देशामध्ये करोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे. सध्याची परिस्थिती पहाता, करोनाग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सबब याबाबत खबरदारीचा उपाय म्हणून आवश्यक ती उपाययोजनां करणे आवश्यक आहे.

उक्त संदर्भ क्र.1 कडील आदेशानूसार जिल्हयात तालुकानिहाय विलगीकरण कक्षाची (Isolation Cell) उभारणी करणे व त्याठिकाणी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी देण्यात आली होती. सदर आदेशानूसार आपल्याकडून केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

तरी सोबत जोडलेल्या विहीत नमून्यातील तालुकानिहाय विलगीकरण कक्षाची (Isolation Center) माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी. सदर माहिती शासनास सादर करावयाची असल्याने विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सोबत विहीत नमून्याची प्रत जोडली आहे.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत माहितीस्तव

1. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई

Scanned by CamScanner